16 NOV 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. कोळेकर, डॉ. डेळेकर यांना एमएएससीची फेलोशिप

शिवाजी विद्यापीठाचा सन्मान; कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार

टेंबलाईवाडी, ता. १५ : पुणे येथील महाराष्ट्र विज्ञान अकादमीतर्फे (एम.ए.एस. सी.) शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. जी. बी. कोळेकर व डॉ. एस. डी. डेळेकर यांना फेलोशिप जाहीर झाली. २०२१ च्या फेलो व यंग असोसिएट्सची यादीत त्यांची नावे आहेत.

डॉ. कोळेकर यांना यापूर्वी भारत सरकारच्या प्रतिष्ठेच्या आय. एन. एस. ए. फेलोशिप, ब्रेनपूल फेलोशिप मिळाल्या आहेत. दक्षिण कोरियाच्या हॅनयांग विद्यापीठाच्या एशियन रिसर्च नेटवर्कची फेलोशिपचेही ते मानकरी आहेत. त्यांचे १५० हून अधिक शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांतून प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या नावावर पाच पेटंट असून, पाच विविध प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत. राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानाचे (रुसा) समन्वयक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

डॉ. डेळेकर यांना सी.व्ही. रामन फेलोशिप (यूएसए), इंडियनॲकॅडमी ऑफ सायन्सेस यांची समर फेलोशिप मिळाली आहे. त्या माध्यमातून त्यांना अमेरिका व बेंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस (आय.आय.एस.सी.) येथे संशोधन करण्याची संधी मिळाली. ते फ्लोरिडा (अमेरिका) येथील ग्लोबल ॲम्बॅसॅडर पुरस्काराचे मानकरी आहेत. त्यांचे ८०हून अधिक शोधनिबंध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पत्रिकांतून प्रकाशित आहेत. ४ पेटंट त्यांच्या नावे आहेत. ८० लाख रुपयांचे पाच मेजर प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत.

दरम्यान, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी डॉ. कोळेकर व डॉ. डेळेकर यांचा ग्रंथभेट देऊन सत्कार केला. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे उपस्थित होते.

टेंबलाईवाडी : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. जी. बी. कोळेकर व डॉ. एस. डी. डेळेकर यांना महाराष्ट्र विज्ञान अकादमीची फेलोशिप मिळाल्याबद्दल त्यांचा ग्रंथभेट देऊन सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.

16 NOV 2021 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विज्ञान अकादमीतर्फे डॉ. कोळेकर, डॉ. डेळेकर यांना फेलोशिप

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील प्राध्यापकांचा कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

पुणे येथील महाराष्ट्र विज्ञान अकादमी (एम.ए.एस.सी.) या प्रतिष्ठित संस्थेकडून सन २०२१ च्या फेलो व यंग असोसिएट्सची यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाच्या डॉ. जी. बी. कोळेकर आणि डॉ. एस. डी. डेळेकर यांना फेलोशिप जाहीर झाली आहे. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दोघांना ग्रंथभेट देऊन गौरव केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे उपस्थित होते. महाराष्ट्र विज्ञान अकादमीच्या काटेकोर निकषांची पूर्तता करीत या दोघा शिक्षक-संशोधकांनी फेलोशिप प्राप्त केली. ही बाब विद्यापीठासाठी भूषणावह आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. शिर्के यांनी काढले.

कोल्हापूर : डॉ. कोळेकर व डॉ. डेळेकर यांना महाराष्ट्र विज्ञान अकादमीची फेलोशीप मिळाल्याबद्दल त्यांचा ग्रंथभेट देऊन गौरव करताना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. सोबत जी.आर. पळसे व प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील.

डॉ. एस. डी. डेळेकर यांना अत्यंत प्रतिष्ठेची समजली जाणारी सी. व्ही. रामन फेलोशीप (युएसए) तसेच इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्सेस यांची समर फेलोशीप मिळाली आहे. त्या माध्यमातून त्यांना अमेरिका व बेंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस (आय.आय.एस.सी.) येथे संशोधन करण्याची संधी लाभली. ते फ्लोरिडा (अमेरिका) येथील ग्लोबल ॲम्बॅसॅडर पुरस्काराचे मानकरी आहेत. त्यांचे ८० हून अधिक शोधनिबंध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पत्रिकांतून प्रकाशित आहेत. ४ पेटंट त्यांच्या नावे आहेत. ८० लाख रुपयांचे पाच मेजर प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत.

डॉ. जी. बी. कोळेकर यांना यापूर्वी भारत सरकारच्या प्रतिष्ठेच्या आय. एन. एस. ए. फेलोशीप, ब्रेनपूल फेलोशीप मिळाल्या आहेत. दक्षिण कोरियाच्या हॅनयांग विद्यापीठाच्या एशियन रिसर्च नेटवर्कची फेलोशीपचेही ते मानकरी आहेत. त्यांचे १५० हून अधिक शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांतून प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या नावावर पाच पेटंट असून पाच विविध प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत. राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानाचे (रुसा) समन्वयक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

पुण्यनगरी



कोल्हापूर :डॉ. कोळेकर व डॉ. डेळेकर यांना फेलोशिप मिळाल्याबद्दल त्यांचा ग्रंथभेट देऊन गौरव करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व अन्य मान्यवर.

कोळेकर, डेळेकर यांना फेलोशिप

कोल्हापूर : प्रतिनिधी

पुणे येथील महाराष्ट्र विज्ञान अकादमी (एमएएससी) या प्रतिष्ठित संस्थेकडून सन २०२१ च्या फेलो व यंग असोसिएटस्ची यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाच्या डॉ. जी. बी. कोळेकर आणि डॉ. एस. डी. डेळेकर यांना फेलोशिप जाहीर झाली आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी डॉ. कोळेकर आणि डॉ. डेळेकर यांचा ग्रंथभेट देऊन गौरव केला.

महाराष्ट्र विज्ञान अकादमीच्या काटेकोर निकषांची पूर्तता करत या दोघा शिक्षक-संशोधकांनी फेलोशिप प्राप्त केली, ही बाब विद्यापीठासाठी भूषणावह आहे, असे उद्गार कुलगुरू डॉ. शिर्के यांनी काढले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे उपस्थित होते.

पुण्यनगरी

बिरसा मुंडा यांची विद्यापीठात जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये बिरसा मुंडा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय भवनात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील, छत्रपती शाहू महाराज मराठा अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. निलांबरी जगताप यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

16 NOV 2021 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांची 'तरुण भारत'ला सदिच्छा भेट

शिवाजी विद्यापीठातील कार्यकालाचा घेतला आढावा: कुलसचिवांचा उद्या कार्यकाल समाप्त होणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी १८ नोव्हेंबर २०१७ रोजी कुलसचिव पदाचा कार्यभार स्वीकारला होता. त्यांचा बुधवार १७ नोव्हेंबर रोजी कार्यकाल समाप्त होत आहे. यानिमित्ताने त्यांनी दैनिक 'तरुण भारत' कार्यालयाला भेट देऊन शिवाजी विद्यापीठातील कार्यकालाचा आढावा घेतला.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचा पाच वर्षाचा कार्यकाल अतिशय सुकर गेला. त्यांच्या कालावधीमध्ये 'नॅकचे ए प्लस मानांकन' मिळाले. जागतिक पातळीवरील संशोधकांच्या यादीत विद्यापीठातील ४७ संशोधकांचा समावेश झाला. शिवाजी विद्यापीठात विविध नवीन अभ्यासकेंद्र आणि शासकीय पातळीवरील अनेक चांगले निर्णय झाले. तसेच दूरशिक्षण विभागात चार ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू झाले असून सुविधा केंद्राचीही स्थापना करण्यात आली. कोरोना कालावधीत डीओटी सेंटरमधील अलगीकरण केंद्राच्या माध्यमातून अनेकांचे प्राण वाचवण्यास मदत केली. महापूराच्या कालावधीत शहरवासियांना पिण्याचे व वापरण्याचे पाणी दिले. तर जनावरांना चाऱ्याचा पुरवठा केला. एकूणच शिवाजी विद्यापीठाच्या प्रगतीत कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांचे मोलाचे योगदान ठरले.

कुलसचिवसह अधिष्ठाता पदांसाठी मुलाखतीच्या प्रक्रियेला प्रारंभ

कुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक, क्रीडा संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण विभागाचे संचालक, चार अधिष्ठाता यांच्या निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे. या पदासाठीचे अर्ज मागवण्यात आले आहेत. या अर्जांची छाननी प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. लवकरच निवड प्रक्रिया पूर्ण होऊन पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सोमवारी 'तरुण भारत'ला सदिच्छा भेट देऊन संस्थापक संपादक बाबुराव ठाकुर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. सोबत वरिष्ठ सहाय्यक कुलसचिव संतोष वंजार.

पुढारी

कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांचा कार्यकाल उद्या संपणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचा १७ नोव्हेंबरला कार्यकाल संपणार आहेत. मात्र कुलसचिवांसह विविध पदांच्या निवडीची प्रक्रिया सहा महिन्यांपासून रेंगाळली आहे. डॉ. नांदवडेकर यांनी १८ नोव्हेंबर २०१६ रोजी पदाचा कार्यभार स्वीकारला. पाच वर्षांनंतर बुधवारी त्यांच्या पदाचा कार्यकाल पूर्ण होत आहे. त्या अनुषंगाने सहा महिन्यांपूर्वी कुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, क्रीडा विभाग, प्रौढ व निरंतर शिक्षण विभागाचे संचालक, चार अधिष्ठाता यांच्या निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे. या पदासाठीचे अर्ज मागविण्यात आले असून त्याची छाननी अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच ही प्रक्रिया पूर्ण होऊन पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार असल्याचे विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

पुण्यनगरी

शिवाजी विद्यापीठात नेहरू यांची जयंती

कोल्हापूर : देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. रवींद्र भणगे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.